**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक - २०७/२०२२**
**महा. शासन वि. मसुजी शामराव पाटील**
**निशाणी क्रमांक- १५/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - २ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

माझे नाव - रोहित महिपतीी खाडे (बक्कल क्र.१५९९)
वय - ३५ वर्षे
व्यवसाय - सरकारी नोकरी
सध्या नेमणूक - मुरगुड पोलीस ठाणे,कोल्हापूर

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

१. सन २०२२ साली मी राधानगरी पोलीस ठाणेत पो.कॉ. म्हणून कार्यरत होतो. दि.२७/०७/२०२२ रोजी सायंकाळी १८.०० वाजताचे सुमारास मी, पो.नाईक गुरव आणि पो.हे.कॉ. बुरटे ०८ असे अवैध धंदे शोधकामी निघालो. पो.हे.कॉ. बुरटे यांना सोळांकूर एक इसम अवैध दारू विक्री करत असल्याची गुप्त माहिती मिळाली. सदरील वेळी आम्ही तिघे सोळांकूरला जाऊन मिळालेल्या माहिती नुसार छापा टाकला असता तिथे एक इसम त्याचे कब्जेत एका पिशवी मध्ये १८० मिलीच्या १८ बाटल्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेल्या अवस्थेत मिळून आला. सदरील वेळी छापा टाकून त्याला कब्जेत घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव मसुजी शामराव पाटील असे सांगितले. सदरील मुद्देमालमधून एक बाटली नमुना पृथक्करणाकरीता बाजूला काढून उर्वरित मुद्देमाल पंचनामा करून जप्त केला. साक्षीदार सांगतो की, २ पंचांसमक्ष पंचनामा केला.

२. सदरील घडलेप्रकाराबाबत मी पोलीस ठाणेत येऊन आरोपी विरूध्द रितसर फिर्याद नोंद केली. आता मला माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यावर

माझी सही आहे ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी P16/PW2** देण्यात येते. आता मला माझा ऑनलाईन प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी P17/PW2** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. यु. एम. मानकर वकील यांचेमार्फत सुरू -**

३. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी न्यायालयात मुद्देमाल हजर नाही. सदरील वेळी आरोपीचे कब्जेत प्लॅस्टीकची पिशवी होती. मी फिर्याद देताना कोणत्या प्रकारची पिशवी होती हे नमुद केलेले नाही, तसे नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. छापा टाकणेपूर्वी पोलीस ठाणेत नोंदवहित तशी नोंद घेतली होती की नाही हे आता मला आठवत नाही. माझे समक्ष पंचनामेवर आरोपींची सही घेतलेली नाही. माझे समक्ष आरोपीला पंचनामेची प्रत दिलेली नाही.

४. छापा टाकणेपूर्वी आरोपीकडे कोणी बोगस गिऱ्हाईक पाठविले नव्हते. सदरील वेळी आरोपीकडे दारू विकत घेणेकरीता कोणी आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटा मजकूर नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दारूच्या केसेस दाखविण्याकरीता मी आरोपी विरूध्द खोटी फिर्याद दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : २०/०८/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २), राधानगरी